महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) मुंबई.

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## दि. २९ मार्च,२०२३ रोजी दुपारी०२.०० वाजता (online पध्दतीने) प्रशासकीय इमारत क्र.०२, तिसरा मजला, बी विंग, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पुर्व), मुंबई-४०० ०७१ येथे झालेल्या संचालक मंडळाच्या १०२ व्या बैठकीचे इतिवृत्त.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## १०२ व्या बैठकीचे इतिवृत्त

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची १०२ वी बैठक दिनांक २९ मार्च, २०२३ रोजी सायं. ०२.०० वा. (Google meet) online पध्दतीने संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय संचालक उपस्थित होते.

| अ. क्र | अधिका-यांचे नांव | पदनाम | सभेतील पद |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री. प्रशांत नारनवरे(IAS) | मा.आयुक्त, समाजकल्याण, पुणे | अध्यक्ष |
| २ | मा.श्री.अनिल कों. आहिरे | व्यवस्थापकीय संचालक, सा.लो.अ.सा.वि.म. मुंबई | सदस्य |
| ३ | मा.श्रीम.मेधा वाके | सहा.कार्यकारी अधिकारी, खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई | सदस्य (आमंत्रित) |

**इतर उपस्थिती** – श्री. डी.के. कामत,कंपनी सचिव सल्लागार, श्री. अ.रा.म्हस्के, महाव्यवस्थापक (अति.कार्यभार), श्री.ज्ञा.वि.नारोळे, उपमहाव्यवस्थापक (प्रशासन)(अति.कार्य.), सा.लो.अ.सा.वि.म. मुंबई.

बैठकीच्या सुरवातीस व्यवरथापकीय संचालक यांनी निदर्शनास आणून दिले की, शारानाकडून महामंडळावर मा.अध्यक्षांची नियुक्ती झालेली नसल्याने, सदर बैठकीस दोनच सदस्य उपस्थित असल्यामुळे, संस्थापन समयलेख व संस्थापन नियमावलीमधील कलम १०० नुसार उपस्थित संचालकांमधून एक संचालकाची अध्यक्ष पदावर निवड करुन संचालक मंडळाची बैठक घेता येते. संस्थापन समयलेख व संस्थापन नियमावलीतील कलम ९६ अन्वये एक तृतीयांश इतकी गणपूर्ती असेल तर बैठक घेता येते. सध्या महामंडळाच्या संचालक मंडळावर व्यवस्थापकीय संचालकासह केवळ शासकीय ०३ संचालक असून हयापैकी दोन संचालक उपस्थित आहेत. त्यामुळे सदर आयोजित बैठक घेता येईल असे निदर्शनास आणून देऊन, गा.आयुक्त, समाजकल्याण हे वरीष्ठ असल्यामुळे मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी बैठकीचे अध्यक्ष स्थान भूषविण्यास विनंती केली. त्याप्रमाणे मा. आयुक्त, समाजकल्याण , पुणे यांनी अध्यक्ष स्थान भुषविले.

मा. अध्यक्ष महोदयांचे स्वागत करुन त्यांच्या परवानगीने बैठकीचे कामकाज सुरु करण्यात आले.

| अ.क्र. | विषय | चर्चा | ठराव |
| --- | --- | --- | --- |
| १०२/०१ | संचालक मंडळाच्या बैठकीकरिता अध्यक्षांची निवड करणे. | सदर बैठकीस दोनच सदस्य उपस्थित असल्यामुळे, संस्थापन समयलेख व संस्थापन नियमावलीमधील कलम १०० नुसार उपस्थित संचालकांमधून एक संचालकाची अध्यक्ष पदावर निवड करुन संचालक मंडळाची बैठक घेता येते. संस्थापन समयलेख व संस्थापन नियमावलीतील कलम ९६ अन्वये एक तृतीयांश इतकी गणपूर्ती असेल तर बैठक घेता येते. सध्या महामंडळाच्या संचालक मंडळावर व्यवस्थापकीय संचालकासह केवळ शासकीय ०३ संचालक असून हयापैकी दोन संचालक उपस्थित आहेत. त्यामुळे सदर आयोजित बैठक घेता येईल असे निदर्शनास आणून देऊन, मा.आयुक्त, समाजकल्याण हे वरीष्ठ असल्यामुळे मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी बैठकीचे अध्यक्ष स्थान भूषविण्यास विनंती केली. त्याप्रमाणे मा. आयुक्त, समाजकल्याण , पुणे यांनी अध्यक्ष स्थान भुषविले. | **ठराव क्र.१०२/०१ :-** सदर विषयास संचालक मंडळामार्फत मान्यता देण्य आली. |
| १०२/०२ | To Grant leave of absence to any absent Directors. | महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई येथील मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती. अंशु सिन्हा, भा.प्र.से. हया काही अपरिर्हा कारणास्तव बैठकीसउपथिताहू | **ठराव क्र.१०२/०२ :-** मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंशु सिन्हा, भा.प्र.से. यांच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शकल्या नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीस मान्यता देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला. | अनुपस्थितीस मान्यता देण्यात आली. |
| १०२/०३ | संचालक मंडळाच्या १०१ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी मिळणेबाबत. | संचालक मंडळाने सदर इतिवृत्ताचे अवलोकन करुन इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | **ठराव क्र.१०२/०३ :-** संचालक मंडळाच्या १०१ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. |
| १०२/०४ | १०१ व्या बैठकीमध्ये मंजुर झालेल्या ठरावावर केलेली कार्यवाही/करावयाची कार्यवाही. | | **ठराव क्र.१०२/०४ :-** सदर विषयास मान्यता देण्यात आली. |
| १०२/०५ | TO TAKE NOTE OF CESSATION OS SHRI. MADAN NAGARGOJE,IAS (DIN :09634370)AS THE MANAGING DIRECTOR AND KEY MANAGERIAL PERSONNEL (KMP) OF THE COMPANY | मा. श्री.मदन नागरगोजे, (भा.प्र.से) व्यवस्थापकीय संचालक हे दिर्घ कालावधीसाठी रजेवर असल्यामुळे, सदर पदावर अन्य अधिका-यांची नियुक्ती होणे महामंडळाच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्यामुळे मा.श्री.अनिल आहीरे, अवरसचिव, सामाजिक न्याय यांची शासनामार्फत नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यास मान्यता मिळणेकरिता सदर प्रस्ताव संचालक मंडळापुढे सादर करण्यात आला आहे. | **ठराव क्र. १०२/०५ :-** सदर विषयास संचालक मंडळाने बिनविरोध मान्यता दिली. |
| १०२/०६ | TO CONSIDER AND APPROVE APPOINTMENT OF SHRI. ANIL AHIRE, (DIN: 09520775) AS THE MANAGING DIRECTOR AND DESIGNATE HIM AS THE KEY MANAGERIAL PERSONNEL (KMP) OF THE COMPANY | शासनामार्फत नियुक्त करण्यात आलेले मा. श्री. अनिल आहिरे, अवरसचिव यांच्या नियुक्तीस संचालक मंडळाने मान्यता दयावी करिता सदर विषय सभेपुढे सादर करण्यात आला आहे. | **ठराव क्र.१०२/०६ :-** सदर विषयास मान्यता देण्यात आली. |
| १०२/०७ | महामंडळाच्या आस्थापनेवरील श्री.रमेश बिसन थोरात, लिपिक/टंकलेखक, जिल्हा कार्यालय, अमरावती यांच्या निलंबनाबाबत. | महामंडळाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले श्री. रमेश बिसन थोरात, लि/टं, जि.का.अमरावती यांना श्री.गणेश नामदेव खडसे या लाभार्थीकडून बँकेकडून कर्ज मंजुर करण्यासाठी रु. १०००/- मात्र रुपयेची लाच स्विकारतांना पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, | **ठराव क्र.१०२/०७ :-** श्री. रमेश बिसन थोरात , लि/टं, अमरावती यांना , महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ च्या नियग क्र.४ च्या पोटनियम क्र.(१) (अ) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (ACB) अमरावती यांनी सापळा रचुन रंगेहाथ पकडुन अमरावती शहर पोलीस स्टेशन,फेजरपुरा अमरावती शहर, अप क्र. १३२/२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करुन दिनांक १४/०२/२०२३ रोजी अटक केले आहे. त्याअनुषंगाने प्रादेशिक व्यवस्थापक, अमरावती यांचेकडुन श्री.थोरात यांचा प्राथमिक अहवाल मुख्य कार्यालयात प्राप्त झाला आहे. प्रादेशिक व्यवस्थापक अमरावती यांच्या प्राप्त प्राथमिक अहवालानुसार श्री.थोरात यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ च्या नियम क्र. ४ च्या पोटनियम क्र. (१) (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मुख्य कार्यालयाच्या दिनांक १४/०२/२०२३ च्या आदेशान्वये दि.१४/०२/२०२३ रोजी (म.न.) पासून निलंबित करण्यात आले आहे. त्यास मान्यता मिळावी. | वापर करुन केलेल्या निलंबनाच्या कार्यवाहीस संचालक मंडळ मान्यता देत आहे. |
| १०२/०८ | श्री.हनुमंत लक्ष्मण वायदंडे,कार्यालयीन सहाय्यक,जिल्हा कार्यालय, उस्मानाबाद व श्री.विठ्ठल भिवा वायदंडे, कार्यालयीन सहाय्यक, प्रादेशिक कार्यालय,पुणे याचे निलंबन संपुष्टात आणून कर्तव्यावर पुन:स्थापित केल्यामुळे कार्योत्तर मंजुरीबाबत. | श्री.हनुमंत लक्ष्मण वायदंडे, तत्कालीन कार्यालयीन सहायक, कोल्हापूर यांना विनापरवानगी गैरहजर राहणे, कार्यालयीन वर्तणूक व शिस्त उल्लंघन प्रकरणी तसेच श्री.विठ्ठल भिवा वायदंडे, तत्कालीन कार्यालयीन सहाय्यक, सांगली, यांना महामंडळाच्या विविध योजना अंतर्गत लाभार्थीकडून वसुलीपोटी वसुल केलेल्या रक्कमेचा अपहार केल्या प्रकरणी मुख्य कार्यालयाचे पत्र क्र.१६४२/२०२१ व १६४३/२०२१, दिनांक २३/११/२०२१ अन्वये निलंबित करण्यात आले होते. | ठराव क्र.१०२/०८ :- श्री.ह.ल.वायदंडे, का.स. व श्री.वि.भि.वायदंडे, का.स. यांचे निलंबन रद्द करण्याकरिता संचालक मंडळाच्या १०१ व्या बैठकीतील ठराव क्र.१०१/३७ अन्वये पारित झालेल्या ठरावानुसार कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबींसाठी गठीत केलेल्या समितीसमोर ठेऊन सा.प्र.विभागाच्या परिपत्रक दि.२०/०४/२०१३ मधील तरतूदीनुसार विभागीय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | श्री.विठ्ठल वायदंडे व श्री.हनुमंत वायदंडे या दोन कर्मचाऱ्यांचे निलंबन प्रकरण संचालक मंडळाच्या १०१ व्या बैठकीतील ठराव क्र.१०१/३७ अन्वये पारित झालेल्या ठरावानुसार कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींसाठी गठीत केलेल्या समितीसमोर ठेवून सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक दिनांक २०/०४/२०१३ मधील तरतुदीनुसार विभागीय चौकशीच्या अधिन राहुन मुख्य कार्यालयाच्या दि.१५/१२/२०२२ च्या आदेशान्वये श्री.एच.एल.वायदंडे, कार्यालयीन सहाय्यक, यांची जिल्हा कार्यालय, उस्मानाबाद येथे व श्री. व्हि.बी.वायदंडे, कार्यालयीन सहाय्यक, यांची प्रादेशिक कार्यालय, पुणे येथे विभागीय चौकशीच्या अधिन राहून त्यांच्या सेवा पुन:स्थापित करण्यात आली आहे. त्यास मान्यता मिळावी. | चौकशीच्या अधिन राहून त्यांना सेवेत पुन:स्थापित करण्यात आलेल्या कार्यवाहीस संचालक मंडळ मान्यता देत आहे. |
| १०२/०९ | महामंडळाच्या आस्थापनेवरील रिक्त पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरणेसाठी मंजुरी मिळणेबाबत. | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दि. ३० जूलै २०१३ अन्वये सहावा वेतन आयोग लागु करण्यात आलेला असून विविध संवर्गातील १७० पदांना मंजुरी देण्यात आलेली आहे. सध्या महामंडळामध्ये विविध संवर्गातील एकुण ९८ पदे कार्यरत असून ७२ पदे रिक्त आहेत. | ठराव क्र.१०२/०९:- सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०२/१२/२०२१, दि.०२/११/२०२२, दि.२१/११/२०२२ मधील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना सामाजिक न्याय व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महामंडळाच्या आस्थापनेवर मंजुर पदाच्या प्रमाणात पदोन्नतीने व सरळ सेवा पध्दतीची एकुण ७२ पदे रिक्त असून (सोबत पदांचा तपशिल जोडला आहे.) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०२/१२/२०२१, दि.०२/११/२०२२, दि.२१/११/२०२२ मधील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. २३/०२/२०२३ च्या पत्रान्वये देण्यात आल्या असून त्याअनुषंगाने ५६ पदे सरळसेवेने व १६ पदे सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय दि.०७/०५/२०२० व दि.०९/०३/२०२२ मधील तरतुदीनुसार (सोबत शासन निर्णय जोडला आहे.) विहित पध्दतीने पदोन्नतीने भरणेबाबत कार्यवाही करण्यात येईल. तरी रिक्त पदे सरळसेवेने तसेच पदोन्नतीने भरण्यास संचालक मंडळाने मान्यता दयावी. | विशेष सहाय्य विभागाच्या दि. २३/०२/२०२३ च्या पत्रान्वये देण्यात आल्या असून, त्या अनुषंगाने ५६ पदे सरळसेवेने व १६ पदे सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय दि.०७/०५/२०२० व दि.०९/०३/२०२२ मधील तरतुदीनुसार भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच वर्ग-२ व वर्ग-३ ची रिक्त पदे शासन मान्यतेनुसार सेवाजेष्ठता व पदोन्नतीने भरण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |
| १०२/१० | सन २०१२ ते सन २०१५ या कालावधीतील विवादित ६७ अधिकारी/कर्मचाऱ्यांचा प्राप्त एक सदस्यीय अहवाल संचालक मंडळासमोर ठेवणेबाबत. | संचालक मंडळाच्या ९२ व्यां बैठकीतील ठराव क्रमांक ९२/०५ अन्वये सन २०१२-२०१५ या कालावधीत विविध संवर्गातील ६७ अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नती, कालबध्द पदोन्नती, वेगवर्धन पदोन्नती तसेच मानीव दिनांक इ. लाभ देण्यात आले असून सदर लाभ विवादित असल्याने त्याप्रकरणाची पडताळणी करण्यासाठी त्रिसदस्यिय समिती गठीत करण्यास मान्यता | ठराव क्र. १०२/१० :- श्री.विजयकुमार वि.दपके (सेवानिवृत्त), अवर सचिव यांनी दि.०५ जानेवारी, २०२३ च्या पत्रान्वये ६७ विवादित कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांची पडताळणी करुन सादर केलेल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देण्यात येऊन त्रिसदस्यिय समितीचा प्राप्त अहवाल पुन्हा संचालक मंडळाच्या बैठकीत ठेवण्याबाबत ठराव पारित झाला आहे. तथापि कोविड-१९ महामारीमुळे त्रिसदस्यिय समिती ऐवजी मुख्यालयाचे आदेश क्र. एसएलएएसव्हीएम/व्यसं/प्रशा/एचओ-८८१/२०२२-२३, दि.२१/०६/२०२२ अन्वये श्री.विजयकुमार वि.दपके (सेवानिवृत्त), अवर सचिव यांची नियुक्ती ६७ विवादित प्रकरणांच्या पडताळणीसाठी करण्यात आली होती.<br>श्री.विजयकुमार वि.दपके (सेवानिवृत्त), अवर सचिव यांनी दि.०५ जानेवारी, २०२३ च्या पत्रान्वये ६७ निवादित कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांची पडताळणी करुन अहवाल मुख्यालयात सादर केला आहे. सदर अहवालाचे सीलबंद पाकीट संचालक मंडळापुढे उघडण्यात आले. त्या अनुषंगाने कार्यवाहीस संचालक मंडळाने मान्यता दयावी अशी विनंती करण्यात आली. विनंतीनुसार संचालक मंडळाने मान्यता दिली. | अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |
| १०२/११ | कर्मचारी कल्याणकारी योजने अंतर्गत एका आर्थिक वर्षात कर्ज मर्यादा वितरण रु.५० लाखा वरुन रु.१ कोटी पर्यंत वाढविणेबाबत. | संचालक मंडळाच्या १७ व्या बैठीकीतील ठराव क्र.१७/०४ अन्वये महामंडळातील कर्मचा-यांना कल्याणकारी योजना लागू करण्यात आलेली आहे. मुख्य कार्यालयाच्या दि.२८/०२/२०२० च्या परपित्रकान्वये (सोबत परिपत्रक जोडले आहे.) घर बांधणी/घर खरेदी/प्लॉट खरेदी, घर दुरुस्ती इ.प्रयोजनासाठी ७ % प्रमाणे तसेच शैक्षणिक, वैद्यकिय व लग्न कार्य इ.प्रयोजनासाठी ४ % प्रमाणे एका | ठराव क्र.१०२/११:- कर्मचारी कल्याणकारी योजने अंतर्गत एका आर्थिक वर्षात कर्ज मर्यादा वितरण रु.५० लाखा वरुन रु.१ कोटी पर्यंत वाढविण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आर्थिक वर्षात ५० लाख कर्ज मर्यादेपर्यंत कर्मचारी/अधिकाऱ्यांना कर्ज देण्यात येते. प्राप्त कर्ज प्रकरणांची छाननी/पडताळणी करण्यासाठी मा.व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य कार्यालयाच्या दि.०७/०७/२०२२ च्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली असून पात्र कर्मचाऱ्यांना उपरोक्त व्याजदराप्रमाणे कर्ज मंजुर करण्यात येते. कर्मचा-यांची मागणी विचारात घेता रु.५० लाख कर्जाची रक्कम अपुरी पडत असल्यामुळे कर्ज वितरणाची मर्यादा रु.५० लाखावरुन रु.१.०० कोटीपर्यंत वाढविण्यात यावी. सदर कर्जाची वसुली ही कर्मचा-यांच्या वेतनातून १००% होत असल्यामुळे कर्मचा-यांच्या मागणीनुसार कर्ज वितरण करण्यास मान्यता मिळावी. | |
| १०२/१२ | कार्यालयीन वाहन क्रमांक MH-०२-DN-९१६१ व MH-०२-CL-५१५५ निर्लेखित करणेबाबत. | महामंडळाचे कार्यालयीन वाहन क्र. MH-०२-DN-९१६१ (टाटा इंडिगो ) हे माहे डिसेंबर, २००७ व MH-०२-CL-५१५५ (स्विफ्ट डिझायर) हे माहे एप्रिल, २०१२ मध्ये खरेदी करण्यात आले असून सदर वाहने खरेदी करुन १० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे.<br>सध्या ही दोन वाहने चेंबूर,मुंबई येथील महामंडळाच्या मुख्य कार्यालयाच्या आवारात पार्कींगमध्ये बंद अवस्थेत उभी असून वित्तीय नियम १९७८ मधील नियम १९-क अन्वये वाहनास १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास निरुपयोगी ठरविण्यात यावे. त्याअनुषंगाने उक्त दोन कार्यालयीन | ठराव क्र.१०२/१२ :- महामंडळाचे कार्यालयीन वाहन क्र. MH-०२-DN-९१६१ (टाटा इंडिगो ) व वाहन क्रं. MH-०२-CL-५१५५ (स्विफ्ट डिझायर) निर्लेखन करण्यास शासनाने घालून दिलेल्या नियम ,अटी व कार्यपध्दतीचा अवलंब करुन वाहन निर्लेखित करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वाहने निर्लेखित करण्यासाठी मान्यता मिळावी. | |
| १०२/१३ | महामंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना "राज्य शासकीय कर्मचारी रागुह वैयक्तिक अपघात विमा योजना" लागू करणेबाबत. | राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७ /प्र.क्र.६९/विमा प्रशासन, दि.११/०८/२०१७ अन्वये राज्यातील शासकीय विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व निमशासकीय कार्यालये, शासकीय महामंडळे, मंडळे , सार्वजनिक उपक्रम यांच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली असून सदर योजना महामंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना कौटुंबिक दृष्ट्या हिताची व लाभदायक आहे. (वित्त विभागाचा शासन निर्णय सोबत जोडला आहे.)<br>उपरोक्त दि.११/०८/२०१७ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने मुख्य कार्यालयाच्या दि.०१/०३/२०२३ च्या परिपत्रकान्वये महामंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना" माहे एप्रिल २०२३ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यास मान्यता देण्यात यावी. | ठराव क्र. १०२/१३ :- महामंडळाच्याआस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना" लागू करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |
| १०२/१४ | शासन निर्णय क्र.एलएएस-२०२२/प्र.क्र.९४/महामंडळे, | महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील दारिद्रय रेषेखालील | ठराव क्र.१०२/१४:- थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि.०४/११/२०२२ अन्वये महामंडळाच्या थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा रु.२५,०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार मात्र) वरुन रु.१,००,०००/- (अक्षरी रु.एक लाख मात्र) पर्यंत वाढविण्यात आली असल्याने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता थेट कर्ज योजने अंतर्गत जिल्हा कार्यालयांना दिलेल्या भौतिक १२०७ व आर्थिक रु.१०.३५ कोटी उद्दिष्टास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत. | गरजू घटकाची आर्थिक उन्नतीसाठी तसेच त्यांना स्वयंरोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करू देण्याच्या उद्देशाने शासनामार्फत शासन निर्णय क्र.एलएएस-२०२२/प्र.क्र. ९४/महामंडळे/ दि. ०४-११-२०२२ अन्वये महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा रू. २५,०००/ -वरुन रू. १,००,०००/- पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच शासनाने सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता भागभांडवलातंर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांकरिता रू. १०० कोटीची आर्थिक तरतूद केली असून त्यापैकी महामंडळास रू. २१.०० कोटी निधी उपलब्ध करून दिलेला आहे. शासन निर्णयानुसार अमंलबजावणीकरणेसाठी महामंडळामार्फत थेट कर्ज योजनेसाठी सन २०२२-२३ या चालू आर्थिक वर्षाकरिता १२०७ लाभार्थीचे भौतिक व रू. १०.३५ कोटी उद्दिष्ट महामंडळाच्या जिल्हा कार्यालयांना निश्चित करून दिले आहे. त्यामध्ये एकूण प्रकल्प रक्कमेमध्ये महामंडळाचा हिस्सा ९५% (रू. १००००/- अनुदानासह) असून उर्वरिता ५% रक्कम ही लाभार्थीची आहे.<br>उक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या अटी-शर्तीनुसार सर्व लाभार्थीची संबधित जिल्हयांचे मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीमार्फत चिठ्ठीद्वारे निवड करण्यात येत आहे. तसेच चिठ्ठीद्वारे निवड झालेल्या लाभार्थीकडून महामंडळामार्फत देण्यात आलेल्या मंजूरीपत्रातील अटी-शर्तीनुसार वैधानिक दस्तऐवजांची पुर्तता करून घेवून संबधित प्रादेशिक व्यवस्थापक यांचेकडून संबधित लाभार्थीचे "नाहरकत प्रमाण" घेवून नियमानुसार निधीचे वाटप करण्यात येणार आहे. शासन निर्णय क्र.एलएएस-२०२२/प्र.क्र. ९४/महामंडळे/ दि. ०४-११- | रु.२५०००/- वरुन रु.१०००००/- पर्यंत वाढविण्यात आली असल्याने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात भौतिक १२०७ व आर्थिक रु.१०.३५ कोटी उद्दिष्टास संचालक मंडळ मान्यता देत आहे. या संदर्भात जास्तीत जास्त उद्दिष्ट साध्य होण्यासाठी महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक तसेच सहा. आयुक्त, यांची संयुक्त बैठक मा.आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात यावी. जेणेकरुन महामंडळाचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २०२२ अन्वये महामंडळाच्या थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा रू. २५०००/- वरून रू.१०००००/-पर्यंत वाढविण्यात आली असल्याने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता थेट कर्ज योजनेअंतर्गत जिल्हा कार्यालयांना दिलेल्या भौतिक १२०७ व आर्थिक १०.३५ कोटी उद्दिष्टास संचालक मंडळाची मान्यता मिळावी. | |
| १०२/१५ | सन २००३-०४ ते २००५-०६ या आर्थिक वर्षापासून प्रलंबित असलेली प्रशिक्षण फी अदा करण्यास मंजुरी मिळणेबाबत. | सन २००३-०४ ते २००५-०६ मध्ये महामंडळामार्फत विशेष केन्द्रीय अर्थसहाय्याचे निधीतून राबविण्यात येत असलेल्या प्रशिक्षण योजनेअंतर्गत मातंग समाजाच्या प्रशिक्षणार्थींना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याकरिता प्रशिक्षण संस्थांना मंजूरीपत्रे देण्यात आली होती. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजूर निधीपेक्षा जास्त प्रमाणात मंजूरीपत्रे दिल्याने ज्या संस्थांनी प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले आहे. त्यापैकी काही प्रशिक्षण संस्थांची प्रशिक्षण फी देणे प्रलंबित होते. देय असलेली प्रलंबित फी मिळावी म्हणून त्या प्रशिक्षण संस्था महामंडळाकडे तसेच शासनाकडे निवेदने देवून वारंवार निधी मागणी करीत होत्या. तसेच काही संस्था मा. न्यायालयात गेलेल्या आहेत.<br>त्यास अनुसरून महामंडळामार्फत संचालक मंडळाच्या ९२ व्या बैठकीत विषय ठेवला असता संचालक मंडळाचा ठराव क्र. ९२/१६ दिनांक १८ एप्रिल २०१८ अन्वये "प्रलंबित प्रशिक्षण फी देय असलेल्या प्रशिक्षण संस्थांची पाहणी करून ज्या प्रशिक्षण संस्था योग्य आहेत अशा प्रशिक्षण संस्थांची फी अदा करण्यास हरकत नाही" असा ठराव पारीत करण्यात आला आहे. त्यास अनुसरून ज्या प्रशिक्षण संस्थांची प्रशिक्षण फी थकित आहे अशा सर्व प्रशिक्षण संस्थांची सविस्तर माहिती मागविण्यात येवून सदर प्राप्त झालेली माहिती तपासून अहवाल सादर करणेबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. ५७३/२०२०/ दि. २८-०२-२०२० अन्वये त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात | ठराव क्र.१०२/१५:- सन २००३-०४ ते २००५-०६ या आर्थिक वर्षापासून प्रलंबित असलेली प्रशिक्षण फी अदा करतांना त्रीसदस्यीय समीतीने पडताळनी केलेल्या एकुण पाव विभागातील २५७ पात्र संस्थांची प्रशिक्षण फी रु.१,१०,१५,३५४/- (अंक्षरी एक कोटी दहा लाख पंधरा हजार तीनशे चोपन्न मात्र ) अदा करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आली होती. समितीने सादर केलेल्या अहवालानुसार पहिल्या टप्प्यात रु.७५.०० लाख अदा करण्यात आलेले आहेत. उर्वरित संस्थाची फी अदा करण्यास संचालक मंडळाने मान्यता दयावी. | |
| १०२/१६ | क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने सादर केलेल्या शिफारशींपैकी शासनाने तत्वत: मंजुर केलेली व महामंडळाशी संबंधित असलेली शिफारस क्र.६०/२१ च्या अनुषंगाने अंमलबजावणी करणेसाठी महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेली रु.७.०० लाखापर्यंतच्या बीजभांडवल योजनेमध्ये बँकेचा सहभाग ५० %, महामंडळाचा निधी ४५ % (रु.१०,०००/-मात्र अनुदानासह) व लाभार्थी सहभाग ५ % अशी योजना पूर्ववत राबविणेस मान्यता मिळणेबाबत. | सदर योजने मध्ये बँकेचा ७५% सहभाग असल्याने बँकां महामंडळामार्फत शिफारस केलेल्या कर्ज प्रकरणांना योग्य प्रतिसाद देत नाहीत, तसेच विविध कारणे दाखवून सदर कर्ज प्रकरणे नामंजूर करतात. त्यामुळे सुमारे ९०% कर्ज प्रकरणे बँकांनी मंजूरी न दिल्याने महामंडळाकडे प्रलंबित राहतात. पर्यायाने मातंग समाजातील गरजू व्यक्तींना वेळेत उदयोग सुरू करता येत नाहीत व मातंग समाजातील गरजू व्यक्तींना महामंडळाच्या सदर योजनेपासून वंचित रहावे लागते. क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशीतील महामंडळाशी संबधित व शासनाची मान्यता असलेली शिफारस क्र. ६०/२१ नुसार अमंलबजावणी करणेसाठी दि. २१-११-२०१२ च्या परिपत्रकानुसार कार्यान्वित करण्यात आलेली बँकेचा हिस्सा ५०%, महामंडळाचा सहभाग ४५% (रू. १००००/- अनुदानासह) व लाभार्थींचा ५% ही योजना पुन्हा कार्यान्वित करणेंस संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर. | **ठराव क्र.१०२/१६ :-** क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशीतील महामंडळाशी संबधित व शासनाची मान्यता असलेली शिफारस क्र. ६०/२१ नुसार अमंलबजावणी करणेसाठी दि. २१-११-२०१२ च्या परिपत्रकानुसार कार्यान्वित करण्यात आली होती त्यामध्ये बँकेचा हिस्सा ५०%, महामंडळाचा सहभाग ४५% (रू.१००००/- अनुदानासह) व लाभार्थीचा ५% ही योजना पुन्हा कार्यान्वित करणेकरिता सदर योजना राबविण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |
| १०२/१७ | एनएसएफडीसी, नवी दिल्ली योजनेअंतर्गत राबविण्यात येत असलेली शैक्षणिक कर्ज योजनेच्या धर्तीवर सदर योजना शासनाकडून प्राप्त होणाऱ्या भागभांडवलाचे निधीमधून | सध्या मातंग समाजाच्या युवक-युवतींची शिक्षणाकडे जास्त कल आहे शिक्षणाचे प्रमाणही वाढलेले आहे. तथापि, उच्च शिक्षणामध्ये स्पर्धा निर्माण झालेली असून मातंग समाजातील युवक-युवतींची नामांकित शिक्षण संस्थेत प्रवेश घेवून उच्च शिक्षण घेण्यासाठी इच्छा असते. परंतू सध्या शिक्षण संस्थांची जास्तीची शैक्षणिक फी भरू शकत नसल्यामुळे ते विदयार्थी | **ठराव क्र.१०२/१७ :-** सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेऊन एनएसएफडीसी, नवी दिल्ली योजने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक कर्ज योजनेच्या धर्तीवर सदर योजना महामंडळास राज्य |

| | | | |
|---|---|---|---|
| | राबविणेस मंजुरी मिळणेबाबत. | नागांकित शिक्षण संस्थेत प्रवेश घेवू शकत नाहीत. परिणामी उच्च शिक्षण घेवू ईच्छिणा-या मातंग समाजाच्या युवक-युवतींना इच्छा व पात्रता असूनही उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते.<br>वरील परिस्थितीचा विचार करून महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील युवक-युवतींना उच्च शिक्षण घेण्यापासून वंचित राहू नयेत याकरिता एनएसएफडीसी मार्फत राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक कर्ज योजनेच्या धर्तीवर सदर योजना राज्य शासनाकडून मिळणा-या भागभांडवल निधीतून राबविणेचा महामंडळाचा मानस आहे.<br>प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये महामंडळाकडील भागभांडवलाचे निधीतून देशांतर्गत १०० व विदेशात १०० युवक-युवतींना विविध अभ्यासक्रमांच्या उच्च शिक्षणाकरीता पात्र प्रशिक्षणार्थीस अनुक्रमे रू. १० लाख व रू. २० लाख कर्ज अल्प व्याजदरामध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.<br>एनएसएफडीसी योजनेमार्फत योजना राबविण्यासाठी कर्ज स्वरुपात जो निधी उपलब्ध करुन दिला जात होता तो विहीत वेळेत परत न केल्यामुळे सदर निधीवर व्याज, दंडव्याज आकारुन वसुलीपोटी रु.९८.२५ कोटी एनएसएफडीसी कार्यालयास परत न केल्यामुळे सदर प्रकरण लवादाकडे हस्तांतरीत करण्यात आले होते. लवादाच्या जवळपास ३२ सुनावण्या झाल्या होत्या. सदर रक्कम गोठया प्रमाणात असल्यामुळे वसुलीची रक्कम भरण्यासाठी शासनाची मान्यता घेऊन सदर विषय कॅबीनेट बैठकीत मंजूर करुन वित्त विभागाच्या मंजूरीने एनएसएफडीसीची रु.९८.२५ कोटी | शासनाकडून प्राप्त होणाऱ्या भागभांडवलाच्या उपलब्ध निधीमधून शासनाच्या मान्यतेने राबविण्यास संचालक मंडळ मंजुरी देत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वसुली भरणा करण्यात आलेली असल्याने पुन्हा एनएसएफडीसी मार्फत सदर योजना राबविणे महामंडळास परवडणारे नसल्यामुळे<br>एनएसएफडीसीमार्फत राबविण्यात येत असलेल्या शैक्षणिक कर्ज योजनेच्या धर्तीवर सदर योजना राज्य शासनाकडून मिळणा-या भागभांडवल निधीतून राबविणेस मान्यता मिळावी. | |
| १०२/१८ | सन २०१४-१५ या कालावधीत खरेदी केलेली व महामंडळाचे ताब्यात व रघुलीला मॉल, वाशी, नवी मुंबई येथे पार्किंग असलेली १० वाहनांच्या पार्किंग चार्जेस मध्ये वाढ करण्याच्या मागणीस अनुसरुन कार्यवाही करण्यास मंजुरी मिळणेबाबत. | महामंडळामार्फत सन २०१४-१५ या कालावधीत गैरव्यवहाराने खरेदी केलेल्या ६५ वाहनांपैकी राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत ६२ वाहने जप्त करून मा. न्यायालयाचे आदेशान्वये १८ वाहने महामंडळाच्या ताब्यात दिलेली आहेत. सदर वाहनांपैकी १० वाहने दिनांक २६-०६-२०१८ पासून मे. कनन सर्व्हिसेस प्रा. लि. रघुलीला मॉल, रेल्वे स्टेशन शेजारी, वाशी,नवी मुंबई येथे पार्किंग केलेली आहेत. सदर वाहने महामंडळाच्या नावे नसल्याने ती वाहने महामंडळाच्या नावे करण्याची बाब न्याय प्रविष्ठ आहे.<br>सदर १० वाहने सन २०१८-१९ पासून मे. कनन सर्व्हिसेस प्रा. लि. रघुलीला मॉल, रेल्वे स्टेशन शेजारी, वाशी,नवी मुंबई यांचेकडे पार्किंग असून सदर वाहनांचे पार्किंग चार्जेस प्रती वाहन प्रती दिन रू. १५०/- + GST या प्रमाणे निश्चित करून देण्यात येत आहे. तथापि, मे. कनन सर्व्हिसेस प्रा. लि. रघुलीला मॉल, रेल्वे स्टेशन शेजारी, वाशी,नवी मुंबई यांचे दिनांक ०१-०१-२०२३ च्या पत्रान्वये दिनांक ०१-०३-२०२३ पासून वाहनांच्या पार्किंग चार्जेस मध्ये प्रती | ठराव क्र.१०२/१८ :- रघुलीला मॉल, वाशी, नवी मुंबई येथे पार्किंग असलेल्या १० वाहनांच्या पार्किंग चार्जेस मध्ये वाढ करण्याच्या मागणीस अनुसरुन पार्कीग चार्जेस चे Analesis करुन, मा. न्यायालयाच्या निकालापर्यंत सदर वाहने सामाजिक न्याय भवन , समाज कल्याण विभागाचे वसतीगृह किंवा महामंडळाच्या मालकिच्या जागेच्या आवारात शेड बांधून ठेवल्यास वाहने सुरक्षित राहतील तसेच पार्किग शुल्क अदा करावे लागणार नाही. याबाबत सदरची कार्यवाही करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वाहन प्रती दिन रू. ३००/- + GST या प्रमाणे मिळावे अशी मागणी केली आहे. याबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी विषयाचे अवलोकन करुन असे सुचविले की, पार्कींग चार्जेस चे Analesis करुन, सदर वाहने सामाजिक न्याय भवन, ठाणे तसेच समाज कल्याण विभागाच्या वसतीगृहाच्या आवारात शेड बांधून वाहने ठेवल्यास नागरिकांची वर्दळ असल्याने वाहने सुरक्षित राहतील. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. | |
| १०२/१९ | महामंडळाच्या योजना निहाय सन २०२२-२३ मधील मुदत ठेवीचा तपशिल मान्यतेबाबत. | सन २०२२-२३ या वित्तीय वर्षामध्ये महामंडळातील विविध योजनांतील शिल्लक निधीपैकी काही निधी बँक ऑफ महाराष्ट्र चेंबुर शाखा येथे मुदत ठेवींच्या स्वरुपात ठेवण्यात आलेले आहेत. मुदत ठेवींचा तपशिल संचालक मंडळाच्या अवलोनार्थ सादर. | विषय क्र.१०२/१९ :- तपशिलात नमूद महामंडळाचा योजना निहाय निधी एक वर्षाच्या कालावधीकरीता मुदत ठेवी स्वरुपात गुंतविण्यात आलेल्या आहेत. या केलेल्या कार्यवाहीस संचालक मंडळ कार्योत्तर मंजुरी देत आहे. |
| १०२/२० | सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये संचालन व प्रशासनावर झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | महामंडळाने प्रस्तावित केल्याप्रमाणे शासनाकडून मान्य झालेल्या तरतूदींपैकी प्राप्त झालेल्या निधीतून रु.९७९.३७ लाख संचालन प्रशासनावर खर्च झालेला आहे. सदर खर्च हा वेतन व वेतनेत्तर यावर आवश्यकतेनुसार खर्च झालेला आहे. तरी सदर खर्चास संचालक मंडळाची मान्यता मिळावी. सदर विषयाचे अवलोकन करुन व चर्चा करुन संचालक मंडळाने मान्यता दिली. | ठराव क्र.१०२/२० :- सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये संचालन व प्रशासनावर झालेल्या खर्चास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १०२/२१ | माहे डिसेंबर २०२२ अखेर वसुली अहवाल अवलोकनार्थ सादर करणेबाबत. | संचालक मंडळाने वसुलीचे अवलोकन केले असता, वसुलीचे प्रमाण अत्यल्प असून याबाबत नाराजी व्यक्त केली. महामंडळाकडून वसुलीचा कालबध्द कार्यक्रम आखण्यात आलेला आहे. वसुली वाढविण्यासाठी कार्यवाही तसेच उपाययोजना सुध्दा अवलंबविण्यात आल्या आहेत. परंतू लाभार्थी वसुलीस प्रतिसाद देत नाहीत. वसुली मागीतल्यास अंगावर धावून येतात. जामीनदारांना नोटीस पाठविल्यास जामीनदार देखील प्रतिसाद देत नसल्याने वसुलीवर परिणाम होत आहे. कलम १३८ अंतर्गत कार्यवाही करुन सुध्दा लाभार्थी प्रतिसाद देत नसल्याने वसुली नगण्य आहे. वरील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. अध्यक्ष महोदयांनी वसुलीसाठी कसोशीने प्रयत्न करण्याबावत आदेशित केले. | ठराव क्र. १०२/२१ :- माहे डिसेंबर २०२२ अखेर वसुली अहवालाचे अवलोकन करुन , वसुली वाढविण्याबाबत प्रयत्नशील रहावे अशा सूचना देऊन सदर विषयास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |
| १०२/२२ | महामंडळाचे अंतर्गत लेखापरिक्षण तसेच वैधानिक लेखापरिक्षणाच्या कामकाजाची सद्यस्थितीची बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत. | **अंतर्गत लेखा परिक्षण –**<br>महामंडळाचे सन २००९-१० चे लेखे पुर्ण असून डिसेंबर २०१४ मध्ये पटलावर ठेवण्यात आलेले आहेत.<br>महामंडळाचे सन २०१०-११ ते २०१६-१७ या कालावधीचे अंतर्गत लेखापरीक्षणाचे कामकाज पुर्ण झाले असून, सन २०१०-११ ते २०१६-१७ या कालावधीचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे अहवाल प्राप्त झालेले आहेत .<br>सन २०१७-१८ ते २०१८-१९ या कालावधीतील मे. जैन व्ही ॲन्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, भुलेश्वर मुंबई यांची महामंडळाच्या अंतर्गत लेखापरीक्षक म्हणून मुख्यालयाचे आदेश क्र. १९५२/२०१९-२० दिनांक २८/११/२०१९ पासून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच सन | ठराव क्र.१०२/२२ :- महामंडळाचे अंतर्गत लेखा परिक्षण तसेच वैधानिक लेखा परिक्षणाच्या कामकाजाच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन लेखा परिक्षणाच्या कामकाजास तसेच लेखा परिक्षणाचे अहवाल /लेखे पटलावर ठेवण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २०१७-१८ ते २०१८-१९ या कालावधीचे अंतर्गत लेखापरीक्षकांचे काम पुर्ण झाले असून अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.<br>सन २०१९-२० ते २०२१-२२ या कालावधीतील अंतर्गत लेखापरीक्षणासाठी मे.रामानंद ॲण्ड असोसिएट, चार्टर्ड अकौटंट, भायंदर यांची दिनांक ३१/०५/२०२२ पासून नियुक्ती करण्यात आली असून दिनांक २७/०६/२०२२ लेखापरीक्षणाची कार्यवाही सुरू आहे.<br>वैधानिक लेखा परिक्षण -<br>महामंडळाचे सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीसाठी मा.भारताचे नियंत्रक व महालेखाकार कार्यालय दिल्ली, यांचे मार्फत मे. गुप्ता सहारीया ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट मालाड मुंबई यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती झालेली आहे. तसेच मे गुप्ता सहारीया ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट मालाड मुंबई यांचेमार्फत महामंडळाचे वैधानिक लेखापरिक्षणाचे कामकाज पुर्ण झाले असून वैधानिक लेखापरिक्षकांकडून सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीचे लेखापरिक्षण अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. सदर अहवाल/लेखे प्राप्त झाल्या नंतर मा.प्रधान महालेखाकार कार्यालयाचे निरीक्षणे/अभिप्राय घेऊन महामंडळाच्या संचालक मंडळ/ वार्षिक सर्वसाधारण सभामध्ये मंजूरीसाठी अहवाल/लेखे सादर करण्यात येतील.<br>तसेच सन २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीसाठी वैधानिक लेखापरिक्षणासाठी मा.भारताचे | |

| | | | |
|---|---|---|---|
| .. | | नियंत्रक व महालेखाकार कार्यालय दिल्ली, यांचे मार्फत मे.पी.पारीख ॲण्ड असोसीएट,विले पार्ले, मुंबई यांची १९-०१-२०२२ पासून नियुक्ती झालेली असून दिनांक २४/०३/२०२२ पासून लेखापरिक्षणाची कार्यवाही सुरू आहे.<br>सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीमधील तसेच सन २०१७-१८ या कालावधीतील अहवाल/लेखे जुलै,२०२३ पर्यंत पटलावर ठेवण्यात येणार आहेत. उर्वरित सन २०२१-२२ पर्यंतचे लेखे अर्थसंकल्पीय अधिवेशनात ठेवण्याचा महामंडळाचा मानस आहे. श्री. संतोष जाधव, लेखा परिक्षक यांच्यामार्फत वरीलप्रमाणे लेख्यांबाबतची माहिती संचालक मंडळापुढे सादर करण्यात आलेली आहे. त्यास संचालक मंडळाने मान्यता दयावी. | |
| १०२/२३ | सन २०१०-११ ते २०१७-१८ या कालावधीचे महामंडळाचे लेख्यांचे Accounting (Database) व अनुषंगिक आर्थिक विवरणपत्रे तयार करण्याच्या कामासाठी, लेखापरिक्षकांची नियुक्तीची बाब मान्यतेसाठी सादर करणेबाबत. | महामंडळाच्या प्रलंबित वार्षिक अहवालांबाबत दिनांक १८/११/२०२२ रोजी दुपारी २.३० वाजता, कक्ष क्र.११४, पहिला मजला विधानभवन मुंबई येथे आढावा बैठक आयोजीत केली होती या अनुषंगाने, मा.व्य.सं.यांचे आदेशानुसार, मा. महा.व्य. यांचे समवेत अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य कार्यालयातील अधिकारी यांची दिनांक १७/११/२०२२ रोजी तातडीची बैठक झाली व सदर बैठकीत महामंडळाचे प्रलंबित वार्षिक लेख्यांबाबत शीघ्रगतीने कार्यवाही करून मार्च २०२३ पर्यंत महामंडळाचे प्रलंबित लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे मा.व्य.सं यांनी निर्देश दिले | **ठराव क्र. १०२/२३:-** सन २०१०-११ ते २०१७-१८ या कालावधीचे महामंडळाचे लेख्यांचे Accounting (Database) व अनुषंगिक आर्थिक विवरणपत्रे तयार करण्याच्या कामासाठी, लेखापरिक्षकांची नियुक्तीस व फी अदा करण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आहेत. उक्त निर्देशाचे अनुषंगाने, सन २०१०-११ ते २०१४-१५ मधील अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण झालेल्या कामाचे अनुषंगाने उपिस्थत केलेले आक्षेप/त्रुटी यांचे निराकरण करून परिच्छेद विहरित लेख्यास अंतीम स्वरुप देण्याकरिता लेखापरिक्षणाचे कामासाठी मे.रामानंद ॲण्ड असोसिएट,लेखापरिक्षक यांना आक्षेप/त्रुटी यांचे निराकरण (Audit complince) करून परिच्छेद विहरित लेख्यास अंतीम स्वरुप देण्याच्या काम देण्यात आले होते.<br>या अनुषंगाने मे.रामानंद ॲण्ड असोसिएट,लेखापरिक्षक यांनी त्यांचा वैधानिक लेखापरिक्षण आक्षेप पुर्ततेचा(AUDIT COMPLIANCE REPORT) अहवाल दि.०८/११/२०२२, हा दिनांक २७/११/२०२२ रोजी सादर केला आहे.<br>सदर अहवालात त्यांनी भाग-३, EXECUTIVE SUMMARY/MAJAR FINDINGS या शिर्षाखाली मुददा क्र.२ ते ८ चे निराकरणाबाबत सुचना केलेल्या आहेत. सदर मुददा क्र.२ ते ८ हे अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षणाच्या कामाचे अनुषंगाने महामंडळाचे लेख्यांचे Accounting (Database) व अनुषंगिक आर्थिक विवरणपत्रे तयार करण्याचे कामाची बाब आहे. तसेच महामंडळाचे लेख्यांचे Accounting (Database) व अनुषंगिक आर्थिक विवरणपत्रे तयार नसल्यामुळे महामंडळाचे प्रलंबित वार्षिक लेख्यांचे काम शीघ्रगतीने पुर्ण करण्याची कार्यवाही करण्याबाबत अडचण येत आहे. सबब, महामंडळाचे प्रलंबित वार्षिक लेख्यांचे काग शीघ्रगतीने पुर्ण करायचे अराल्यारा गहागंडळाचे रादर प्रलंबित कालावधीचे लेख्यांचे Accounting | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (Database) व अनुषंगिक आर्थिक विवरणपत्रे तात्काळ तथा प्राधान्य क्रमाने तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. असेही निरीक्षण नोंदविलेले आहे.<br>तथापि, महामंडळाचे सन २०१०-११ ते २०१७-१८ या कालावधीचे लेख्यांचे Accounting (Database) व अनुषंगिक आर्थिक विवरणपत्रे तयार करण्याचे कामासाठी उदयोग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस२०२१/प्र.क्र.८/ उदयोग-४ मंत्रालय मुंबई दि. ०७/०५/२०२१ अन्वये दरपत्रक मागावून , वित्तीय नियमावलीनुसार रू.१०.०० लाख (रूपये-दहा लाख मात्र) रक्कमेच्या आत दर असतील अशा ४ लेखेविषयक सेवापुरवठादारांच्या कंपनी यांच्याशी संपर्क व पत्रव्यवहार करून, त्यांचे कडून सन २०१०-११ ते २०१७-१८ या कालावधीचे लेखापरीक्षणाच्या Accounting (Database) व अनुषंगिक आर्थिक विवरणपत्रे तयार करण्याच्या कामकाजासाठी सिलबंद लिफाप्यात दरपत्रक मागविण्यात आलीत.<br>तसेच प्राप्त झालेल्या ०४ वेगवेगळ्या कंपनीचे दरपत्रकाचे अवलोकन केले असता काव्या स्माट्र सर्विसेस (ओपीसी), मीरा रोड ठाणे यांचे सर्वात न्युनतम दरपत्रक रक्कम रूपये १,००,०००/- (अक्षरी-रु. एक लाख मात्र) प्रती वर्ष असल्याने सन २०१०-११ ते २०१७-१८ आठ वर्षाच्या अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षणाचे कामाचे अनुषंगाने Accounting (Database) व अनुषंगिक आर्थिक विवरणपत्रे तयार करण्याचे कामासाठी, काव्या स्माट्र सर्विसेस (ओपीसी), मीरा रोड ठाणे यांची लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सदर कामासाठी शुल्क/फि रक्कम रूपये १,००,०००/- (अक्षरी-रु. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एक लाख मात्र) प्रती वर्ष असे सन २०१०-११ ते २०१७-१८ आठ वर्षासाठी रक्कम रूपये ८,००,०००/- (अक्षरी रू. आठ लाख मात्र) व नियमाप्रमाणे जी.एस.टी. रक्कम रूपये १,४४,०००/- (अक्षरी रू. एक लाख चौरेचाळीस हजार मात्र) असे एकूण रक्कम रूपये ९,४४,०००/-( अक्षरी रू. नऊ लाख चौरेचाळीस हजार मात्र) शुल्क/फि मान्यतेसाठी सादर. | |
| १०२/२४ | मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय. | मा.अध्यक्ष महोदयांनी बैठकीच्या शेवटी असे सूचित केले की, १ जानेवारी २०२३ पासून सामाजिक न्याय पर्व म्हणून साजरे केले जात आहे. करिता सामाजिक न्याय विभाग तसेच समाजकल्याण यांच्या विद्यमाने राबविण्यात येणा-या योजनांचा जास्तीत जास्त लोकांना फायदा मिळावा याकरिता प्रयत्नशील रहावे. मातंग समाजाच्या योजना क्रियांन्वीत करुन देता येतील या करिता कार्य योजना आखून, Action Group च्या माध्यमातून उद्दिष्ट देण्यात यावे. व जास्तीत जास्त उद्दिष्ट साध्य होईल याबाबत प्रयत्न करावे. सहा. आयुक्त यांच्या सहकार्याने तसेच महामंडळाच्या अधिका-यांशी समन्वय करुन पात्र लाभार्थी निवडावे व त्यांना योजनांचा परिपुर्ण लाभ देण्यात यावा. सदर कामात परदर्शकता असावी यासाठी लाभार्थी निवड समितीमार्फत लाभ देण्यात यावा. | |
| १०२/२४/०१ | ब्रिक्स इंडिया कंपनी प्रा.लि. कंपनीस मुदतवाढ मिळणेबाबत. | ब्रिक्स इंडिया कंपनी प्रा.लि. कंपनीचा करार ३१ मार्च २०२३ रोजी संपुष्ठात येणार असुन उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचा शासन निर्णय क्र. काआआ/२०१३/प्र.क्र..२३३/कामगार-८ | **ठराव क्र.१०२/२४/०१ :-** ब्रिक्स इंडिया कंपनी प्रा.लि. या कंपनीच्या करारास ०२ (एप्रिल-२०२३ ते मे-२०२३) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दिनांक १४/०३/२०२३ अन्वये अद्याप कार्यवाही करण्याच्या अटी व शर्ती प्राप्त झालेल्या नाहीत शासनाकडुन SOP प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यास १ ते २ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. तोपर्यंत सदर करारास २ महीन्याची मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तरी सदर कंपनीसमवेत करार करण्यास मान्यतेसाठी सादर. | महिन्यांची मुदतवाढ देण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे. |

डि. के. कामत
कंपनी सचिव

संतोष जाधव
लेखा परिक्षक

मेधा वाके (निमंत्रित)
सहा.कार्यकारी अधिकारी,
खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

अनिल आहिरे
मा. व्यवस्थापकीय संचालक तथा बैठकीचे संचालक
साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे
विकास महामंडळ (मर्या.) मुंबई

प्रशांत नारनवरे
मा. आयुक्त, समाजकल्याण, पुणे तथा बैठकीचे अध्यक्ष.
साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास
महामंडळ (मर्या.), मुंबई